अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरूवार, दि.१९ जानेवारी २०२३ | ▶ वर्ष : २१ वे ▶ अंक : ११४ वा किंमत : ५ रुपये ▶ पाने ८

## १५ वर्षीय मुलाला पळवले

✔ **मंगळवेढा** : मंगळवेढा शहरातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलाला फूस लावून पळवून नेल्याची घटना घडली. यातील अल्पवयीन मुलगा मंगळवेढा शहरात आला होता. दि.१७ रोजी दुपारी १२ रोजी शहरातील दामाजी चौकातून अज्ञात व्यक्तीने त्याला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पोलिसात दाखल झाली असून या प्रकरणी अज्ञात इसमाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यापूर्वीही मंगळवेढा शहराच्या एमआयडीसी परिसरातून नोव्हेंबर महिन्यात बाहेरील राज्यातील एका चार वर्षीय बालकाला अज्ञात व्यक्तीने पळवून नेण्याचा प्रकार घडला असून त्याचा तपास अद्यापही लागला नसून पुन्हा शहरातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलास पळवून नेण्याचा प्रकार घडल्याने पालकवर्गातून भीती व्यक्त होत आहे.



० ते ५० धावा : ५२ चेंडू
५१ ते १०० धावा : ३५ चेंडू
१०१ ते १५० धावा : ३५ चेंडू
१५१ ते २०० धावा : २३ चेंडू

# शेतकरी कर्जमुक्तीसाठी ७०० कोटी

## नियमित कर्जफेड करणाऱ्यांना मिळणार ५० हजार रुपये

✔ सुराज्य/सोलापूर

**मागील महाविकास आघाडी सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आणलेल्या महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील दुसरा टप्पा म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देणारी योजना विद्यमान शिंदे-फडणवीस सरकारने आणली आहे. याच योजनेअंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी आता या सरकारने ७०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. यामुळे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळाला आहे.**

राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी यापूर्वीच्या महाविकास आघाडी सरकारने महात्मा ज्योतिराव फुले कर्जमुक्ती योजना आणली होती. या योजनेत शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्यात आले होते. ज्या शेतकऱ्यांनी कर्ज थकवले; त्यांना या योजनेचा लाभ मिळाला. मात्र ज्यांनी नियमित कर्जफेड केली; त्या शेतकऱ्यांसाठी काय? असा प्रश्न त्यावेळी निर्माण झाला होता. महाविकास आघाडी सरकार गेल्यानंतर सत्तेत आलेल्या शिंदे-फडणवीस सरकारने अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपये देण्याचा निर्णय घेतला होता. याच योजनेसाठी आता शिंदे-फडणवीस सरकारने ७०० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

### ▶ शेतकऱ्यांना दिला दिलासा

**प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी यापूर्वी २९०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून आता पुन्हा ७०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे सरकारवर ४७०० कोटी रुपयांचा अतिरिक्त भार राज्याच्या तिजोरीवर पडणार आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात कोरोनामुळे निधी रखडला होता. तो निधी आता शिंदे-फडणवीस सरकारने मंजूर करून शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे.**

- ▶ ४७०० कोटी रुपयांपैकी २ हजार ३५० कोटी रुपये अनुदान शेतकऱ्यांना १६ सप्टेंबर २०२२ पर्यंतच मिळाले आहे.
- ▶ दि. १८ ऑक्टोबर २०२२ रोजी ६५० कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरित केल्याचे यापूर्वीच सांगितले आहे..
- ▶ याच कामासाठी यापूर्वी २ हजार ९०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता.
- ▶ आता एकूण ४ हजार ७०० कोटी रुपयांचा अतिरिक्त भार राज्याच्या तिजोरीवर पडणार आहे.



# द्विशतकवीर

- शुभमन गिलची २०८ धावांची खेळी
- न्यूझीलंडच्या ब्रेसवेलचा पलटवार
- भारताचा १२ धावांनी विजय

✔ सुराज्य/हैद्राबाद

भारत विरुद्ध न्यूझीलंड पहिल्या एकदिवसीय सामन्यात एक अतिशय रोमहर्षक लढत पाहायला मिळाली. सर्वात आधी भारताच्या शुभमन गिलने वादळी द्वीशतक ठोकत भारताची धावसंख्या ३४९ पर्यंत नेली. त्यानंतर ३५० धावांचं तगडं लक्ष्य न्यूझीलंडच्या मायकल ब्रेसवेलनं १४० धावांची तुफान खेळी करत जवळपास गाठलंच होतं. पण अखेरच्या षटकात तो शार्दूल ठाकूरच्या अप्रतिम चेंडूवर पायचीत झाला आणि भारतानं सामना १२ धावांनी जिंकला.



## कर्जास कंटाळून रिक्षा चालकाची आत्महत्या

✔ **सोलापूर** : कर्जबाजारी झाल्याने एका ३२ वर्षीय रिक्षा चालकाने विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. ही घटना हैद्राबाद रोडवरील रसिक हॉटेल समोर असलेल्या शेतातील विहीरीत मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली.त्याचा मृतदेह अग्निशामकच्या पथकाने बुधवारी दुपारी शोधून काढला.



इरफान मौलवी बागवान (वय ३२ रा. सरवदेनगर, हैद्राबाद रोड) असे मयताचे नाव आहे. त्याला रिक्षा व्यवसायात कर्ज झाले होते. आपण विहीरीत आत्महत्या करीत असल्याचे पत्नीला मोबाईल वरून सांगितले होते. काल सायंकाळी उशिरापर्यंत अग्निशामकचे पथक आणि त्याचे नातेवाईक हॉटेल समोरच्या शेतातील विहीरीत मयताचा शोध घेतला.मात्र मृतदेह आढळले नव्हते. आज दुपारी पथकाने प्रयत्न केल्यानंतर त्याचा मृतदेह आढळून आला. मयत इरफान बागवान याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. या घटनेची नोंद जोडभावीपेठ पोलिसात झाली. हवालदार पैकेकरी पुढील तपास करीत आहेत.

## ७ महिन्याच्या मुलाचा खून; वडिलांवर गुन्हा

✔ सुराज्य/पंढरपूर

सुपली (ता. पंढरपूर) येथे ७ महिन्यांच्या लहान मुलाचा कॅनॉलमध्ये साठलेल्या पाण्यात मृतदेह सापडला होता. या प्रकरणी अकस्मात मयत पंढरपूर ग्रामीण पोलिसात दाखल करण्यात आले होते. मात्र पोलिसांना मुलाच्या वडिलांवर संशय बळावल्याने वडिलांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याप्रकरणी पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, सहायक फौजदार मुंडे, मोटे, पोलीस हवा. शेंडगे, सावंत, पोलीस नाईक सुरवसे, सय्यद, इंगवले, शिंदे यांनी तातडीने सुपली येथील कॅनॉल जवळील घटनास्थळाकडे धाव घेतली होती. त्यावेळी विक्रांत हा ७ महिने वयाचा मुलगा कॅनॉलमधील साठलेल्या पाण्यामध्ये पडलेला दिसून आला. वडील सुभाष साहेबराव डुकरे (रा. भाबुळगाव ता. जि. नांदेड) यांच्याकडे विचारपूस केली. ते पत्नी, मुलासह ऊस तोडणी करिता आल्याचे सांगितले. चौकशी दरम्यान मृत मुलाच्या वडिलांवर संशय बळावल्याने सुभाष साहेबराव डुकरे (रा. भाबुळगाव, ता.जि.नांदेड) यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## न्यायाधीश पदाच्या परीक्षेत सोलापूरचे सुबोध भैसारे राज्यात प्रथम

✔ सुराज्य/सोलापूर

सन २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या दिवाणी न्यायाधीश (क.स्थर) व न्यायदंडाधिकारी (प्र.वर्ग) परीक्षेचा निकाल नुकताच एम. पी. एस.सी ने जाहीर केला. त्यात सुबोध अशोक भैसारे यांनी राज्यात प्रथम क्रमांक मिळवला.



भैसारे यांनी सोलापूर येथील लिटिल फ्लॉवर कॉन्व्हेन्ट मध्ये दहावी तर चंद्रपूर येथील जनता महाविद्यालयातून बारावी विज्ञान शाखेतून पूर्ण केली. कायद्याची पदवी पुणे येथील आय.एल.एस. महाविद्यालयात घेतली. पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे एल एल.एम.पूर्ण केले. कोरोना काळात त्यांनी कायदा शाखेतून दोन्ही सेट आणि नेट परीक्षा पास केल्या. त्यांचे वडील जिल्हा व सत्र न्यायाधीश पदावरून सेवा निवृत्त झाले असून ते सध्या सोलापूर येथे ग्राहक तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. त्यांची आई गृहिणी आहे. त्यांचे थोरले बंधू यांची सन २०२१ मध्ये आय. ए. एस.पदावर नियुक्ती झाली आहे.



## लक्झरी बस पलटी होऊन महिलेचा जागीच मृत्यू, ३५ प्रवाशी जखमी

✔ सुराज्य/मंगळवेढा

अतिवेगाने व निष्काळजीपणे लक्झरी बस चालवून पलटी करून भाविक, महिला रामकुंवरबाई भूपतसिंह गुज्जर (वय ६८ रा.मोहनगड, मध्यप्रदेश) हिच्या मृत्यूस व ट्रॅव्हल्समधील ३५ भाविकांना गंभीर जखमी केल्याप्रकरणी चालक चंद्रकांत रामगोपाल उच्चार्या (रा.मिर्झापूर ग्वालियर) याला पोलिसांनी अटक केली आहे.

या घटनेची हकिकत अशी, फिर्यादी हणवीरसिंह भूपतसिंह गुज्जर (वय ३०), त्यांची मयत आई व इतर जखमी भाविक मध्यप्रदेशमधून विजापूर-मंगळवेढा मार्गे पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी जात असताना दि.१८ रोजी सकाळी ६ वाजता. जयभारत टुर्स अँड ट्रॅव्हल्स या कंपनीची लक्झरी बस (यू.पी. ८० एफ. टी.८२८३) यामधून जात असताना आरोपी तथा चालक चंद्रकांत उच्चार्या याने लक्झरी बस हयगयीने भरधाव वेगात निष्काळजीपणे चालवल्यामुळे रस्त्याच्या खाली खड्ड्यात पलटी झाले. यामध्ये रामकुंवरबाई गुज्जर (वय ६८ ) हिच्या मृत्यू झाला. या अपघाताम्ये अक्का ओझा (वय ६०), मानसिंह राठोड, पार्वती गुज्जर (वय ६०),सेफकुमारी शर्मा (वय ५०), सरोज लोधी (वय ५०), सरचनी कुमार कुशवाह,ढिला सिंग (वय ६०), रामलाल (वय ६५), महावीर राठोड ( वय ७६), मुन्नीदेवी (वय ६४),



राजबाई राठोड (वय ५०), खुवाज सिंग (वय ५०), नाथूराम (वय ६०), सुमेश कुशवाह (वय २५), रामचरण कुशवाह (वय ६५), पुरणलाल ओझा (वय ६०), रामनिवास राठोड (वय४५), धीरजसिंग ओझा (वय ६३), बाबूलाल राठोड (वय ७०), सीताराम राठोड (वय ७१), गोलकुमार कुशवाह (वय ३३), मुन्नीबाई कुशवाह (वय ४०),रामगोपाल चंदल (वय ४०), मुन्नीदेव चंदल, गब्बलाल कुशवाह (वय७०), गुलाब गजराम (वय ४५), सुलतान पारेहा (वय ५०), लिलाबाई कुशवाह (वय ६०), गुलाबाई कुशवाह (वय ४०), कुमारीबाई राठोड (वय ५०), कस्तुरी राजदूत (वय ५०), अशीर कुशवाह (वय ५०),कुमान सिंह (वय ५५),नाथीयाबाई सिंह (वय ५५), सुमीकुमार कुशवाह (वय १७) आदी ३५ भाविक या अपघातात जखमी झाले. जखमी भाविकांना मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात, सोलापूर येथील शासकीय रुग्णालय व अन्य खाजगी दवाखान्यात उपचारासाठी भरती करण्यात आले आहे.

हा अपघात विजापूर ते पंढरपूर जाणाऱ्या मार्गावरील मंगळवेढा हद्दीतील डिकसळ गावचे शिवारात येड्राव फाट्याच्या जवळ झाला आहे. दरम्यान या अपघाताचे वृत्त समजताच पोलीस निरीक्षक रणजीत माने यांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना तात्काळ रुग्णवाहिकेच्या माध्यमातून उपचारासाठी विविध ठिकाणी दाखल करण्यात आले. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सत्यजीत आवटे हे करीत आहेत. या अपघातामध्ये बाहेरील राज्यातील भाविक जखमी झाल्याने मंगळवेढा तालुक्यात दिवसभर अपघाताविषयी चर्चा होत होती. मोठ्या प्रमाणात अपघातात भाविक जखमी झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




'मस्त चाललयं' तुमचं!

| कल्याण |
|---|
| 245-15-168 |


| मेन बाजार |
|---|
| 688-24-590 |

# उड्डाणपुलासाठी पहिल्या टप्प्याची जागा संपादन कार्यवाही सुरू

## जुना पूना नाका, संभाजी महाराज चौक ते शिवाजी महाराज चौकापर्यंतच्या जागेच्या खुणा केल्या निश्चित

✔ **सोलापूर** : शहरातून जाणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामासाठी प्रत्यक्षात बुधवार पासून जागा संपादन कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. पहिल्या टप्पात पुना नाका, छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंतच्या जागेच्या खुणा निश्चित करून मिळकतदारांना जागा खुली करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शहरात जुना पुणे नाका ते भैय्या चौक ते रेल्वे स्टेशन ते पत्रकार भवन आणि सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती गेट, जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन असे दोन उड्डाण पूल होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून हे काम होणार आहे. यासाठी भूसंपादनाची संपूर्ण



जबाबदारी ही सोलापूर महापालिकेची राहणार आहे. बुधवारपासून जुना पुणे नाका ते भैय्या चौक ते रेल्वे स्टेशन ते पत्रकार भवन पर्यंतच्या या उड्डाणपुलासाठी बाधित मिळकती ताब्यात घेण्यासाठी जागेवर मोजमाप करून प्रत्यक्षात खुणा करण्यात आल्या. यावेळी साह्ायक अभियंता दिवाणजी तसेच भूसंपादन विशेष घटक अधिकारी, नगररचना अधिकारी कर्मचारी यांनी मिळकतदारांना जागा खुली करण्याच्या सूचना केल्या. तसेच जे मिळकतदार भेटले नाहीत अशा मिळकतदारांच्या मिळकतीवर नोटीस डकवण्यात आली आहे. दरम्यान, जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या सेक्शनच्या भूसंपादनासाठी ६७ कोटी तर जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला या सेक्शन दोन साठी ५० कोटी असे एकूण ११७ कोटी रक्कम लागणार आहे. शासनाकडून भूसंपादनाचा पहिला हप्ता हा ४१ कोटी ८३ लाखांचा महापालिकेस प्राप्त झाला आहे. शासनाची ही रक्कम तसेच पालिकेच्या हिस्सा २ कोटी ६७ लाख, अशी रक्कम भूसंपादन विभागाकडं वर्ग करण्यात आली आहे.

### ▶ मालमत्तेवर नाव चढवून राष्ट्रीय महामार्गाकडे हस्तांतरित करणार

पहिल्या टप्प्यात पुना नाका, छत्रपती संभाजी महाराज चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंतच्या या भागातील प्रत्यक्षात भूसंपदानासाठी भूसंपादन विशेष घटकांनी जागा ताब्यात घेण्याचे सूचित केले होते. त्यानुसार पुना नाका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या भागातील बाधित मिळकती ताब्यात घेण्याच्या प्रक्रियेला सुरवात करण्यात येणार आहे. या भागात एकूण ३० मिळकती बाधित झाल्या आहेत. या मिळकती ताब्यात घेतल्यानंतर मालमत्ता पत्रकावर महापालिकेचे नाव चढवण्यात येणार आहे आणि त्या नंतर राष्ट्रीय महामार्गाकडे कामासाठी हस्तांतरित करण्यात येणार आहेत.

### ▶ कागदपत्रांची खात्री करूनच मिळकतीची रक्कम मिळणार

मिळकतदारांनी आपली जागा खुली करून जागा ताब्यात द्यावी आणि ताबा पावती घ्यावी आणि प्रशासनाने मागणी केलेली मिळकतीची आवश्यक कागदपत्रे भूसंपादन विशेष अधिकाऱ्यांकडे जमा केल्यानंतर त्या सर्व कागदपत्रांची खात्री करून भूसंपादन विशेष अधिकाऱ्यांकडून बाधित मिळकतदारांना नियमानुसार मिळकतीची रक्कम अदा करण्यात येणार असल्याचे समजते. बुधवार पासून जागेचा ताबा घेण्याच्या प्रक्रियेला सुरवात करण्यात आल्याने उड्डाणपुलाच्या कामास गती येणार आहे.